Government of Maharashtra

# Public Health Department

## District Integrated Health and Family Welfare Society

# Civil Surgeon Office

# Civil Hospital Amravati

## Khaparde Garden 444602

1) Email ID: csamravati2016@gmail.com
2) Subject: Quotation for FTTH Internet at NHM Office
3) Year: 2026-2027

Civil Surgeon
General Hospital, Amravati

## FTTH इंटरनेट करिता दर करारासाठी आवश्यक अटी व शर्ती:

अ) लिफाफा -१  तांत्रिक लिफाफा  (लिफाफ्यावर तांत्रिक लिफाफा-इंटरनेट असे नमूद करावे.)

१) पुरवठा धारकांनी दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्र (**Shop Act**) जोडणे आवश्यक आहे.

२) **GST** रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

३) आयकर नोंदणी प्रमाणपत्र (**PAN Card**)

४) व्यवसायाचे स्वरूप इंटरनेट प्रोव्हायडर म्हणून दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्रा मध्ये नमूद असणे आवश्यक आहे.

ब) लिफाफा -२ आर्थिक लिफाफा (लीफाफ्यावर आर्थिक लिफाफा-इंटरनेट असे नमूद करावे.)

१) पुरवठाधारकांनी दर हे दिलेल्या नमुन्यातच लेटरहेडवर रबर स्टॅम्प सह सादर करणे अनिवार्य राहील.

२) पुरवठाधारकांनी दरपत्रक हे बाजार भावापेक्षा किंवा एमआरपी पेक्षा जास्त नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

३) पुरवठाधारकांनी दर हे संपूर्ण करासहित व इंस्टॉलेशन शुल्का संहित सादर करणे अनिवार्य आहे.

### अटी व शर्थी -

१) पुरवठा धारक स्थानिक क्षेत्रातील असणे अनिवार्य आहे.

२) दरकरार एक वर्ष करीता असणार आहे.

३) दरपत्रके मध्ये दर नमूद करतांना खाडा खोड अथवा ओव्हर रायटिंग असल्यास अपात्र ठरविण्यात येईल.

४) दर हे विहित नमुण्यात सादर न केल्यास अपात्र ठरविण्यात येईल.

५) लिफापा -१ मधील १ ते ४ कागदपत्रे सादर न केल्यास अपात्र ठरविण्यात येईल व त्याचे लिफापा -२ उघडण्यात येणार नाही.

६) ज्या पुरवठादाराला अथवा संस्थेस काम मंजूर करण्यात येईल त्यांना आदेश निर्गमित करण्यापूर्वी अतिरिक्त त्यांचेकडून रक्कम १००/- स्टॅम्प पेपरवर इंटरनेट सुविधा पूरवणेबाबतच्या अतिरिक्त अटी व शर्थींस बंधपत्र लिहून घेण्यात येईल.

७) पुरवठाधारकांचे देयकांमधून नियमाप्रमाणे **GST** व **TDS** कपात करण्यात येईल.

८) सदर प्रक्रिया व प्रक्रियेतील कोणताही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्थीमध्ये कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्याचा/राखून ठेवण्याचा तसेच सुधारणा करण्याचा व कोणत्याही अटीच्या अर्थाबाबत किंवा ईतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्भवल्यास, तसेच दरपत्रक मंजूर करणे अथवा नाकारणे, तसेच आवश्यकता भासल्यास विभागून देणे, अटी व शर्थी मध्ये शिथिलतेबाबत संपूर्ण अधिकार/हक्क मा. जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती यांनी राखून ठेवले आहेत.

### अतिरिक्त अटी व शर्थी -

१) इंटरनेट सुविधेचा डाउनलोड/उपलोड वेग  ३०० एमबीपीएस च्या वर असणे आवश्यक आहे.

२) इंटरनेट सुविधा देणारी कंपनी खाजगी प्रकारातील असणे आवश्यक आहे.  इंटरनेट सुविधा केबल द्वारेच जोडणे आवश्यक आहे.

३) सदर इंटरनेट सेवा रुग्ण व रुग्णालयीन कामकाजकरिता असल्याने कुठल्याही परिस्थितीत सेवा खंडित झाल्यास १ तास किंवा त्यापेक्षा कमीत वेळात पूर्ववत करून देणे बंधनकारक आहे.

४) मागणी करण्यात आलेल्या डाउनलोड/अपलोड चा वेग (३०० एमबीपीएस) स्थिर असणे आवश्यक आहे.

५) इंटरनेट सुविधा सुरू असतांना उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणीचा त्वरित निपटारा करणे आवश्यक आहे.

६) केबल खराब झाल्यास किंवा चोरी गेल्यास तसेच मॉडेम नादुरुस्त झाल्यास कुठल्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क भरण्यास या कार्यालयास मागणी करण्यात येवू नये किंबहुना सदर कार्यालय सेवा शुल्क भरणा करणार नाही याची नोंद घ्यावी.

७) एक वर्षाच्या मुदतीत येणारे सर्व प्रकारच्या मेंटेनन्स बाबत निशुल्क सेवा द्यावी लागेल त्यानुसार लिफापा -२ आर्थिक लिफापा सर्व शुल्क जोडून देण्यात यावे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र च्या https://nhm.maharashtra.gov.in/ या संकेत स्थळावर सदर अटी व शर्थी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**दरपत्रक सादर करण्याचा कालावधी तक्ता:**

| अ. क्र. | विवरण | |
|---|---|---|
| १ | दरपत्रके सादर करण्याचा कालावधी | दिनांक: १८/१०/२०२६ सकाळी १० ते दिनांक: २६/१०/२०२६ दुपारी ४ वाजे पर्यन्त |
| २ | दारपत्रके सादर करावयाचे ठिकाण किंवा कार्यालय | आवक जावक विभाग, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, अमरावती, गजानन साई मंदिरच्या मागे, खापऱ्डे बगीचा, अमरावती |

दरपत्रकाचा नमूना (लेटरहेड वर)

दिनांक: __/__/____

प्रती,

मा. जिल्हा शल्य चिकित्सक,

जिल्हा रुग्णालय, अमरावती

विषय: BSNL सोडून खाजगी फायबर ऑप्टिक इंटरनेट सुविधा वार्षिक तत्वावर पुरविण्याबाबतचे दरपत्रक

संदर्भ: NHM, महाराष्ट्र संकेतस्थळ वरील जाहिरात प्रसिद्ध दिनांक: १८/१०/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आम्ही आमच्या संस्थेचे इंटरनेट चे दर खालील बाब निहाय शासकीय कार्यालयात वार्षिक तत्वावर जोडून देण्याकरिता सादर करीत आहोत.

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | इंटरनेट प्लान चे नाव | वार्षिक भाडे (रुपये) | केबल इंस्टॉलेशन (रुपये) | जि.एस.टी. (रुपये) | एकूण (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय आरोग्य अभियान, जि. रु. अमरावती | | | | | |
| | | | | | एकूण रक्कम (रुपये) | |

उपरोक्त सादर केलेले दर हे सर्व कर व इंस्टॉलेशन सहित सादर करीत आहेत.

**प्रमाणपत्र**

**मी याद्वारे अधोरेखित करतो आहे की वरील सादर केलेले दर बाजारभावपेक्षा जास्त नाहीत तसेच मी जाहिरातीमध्ये नमूद असलेल्या सर्व अटी व शर्थी मला मान्य आहेत. सादर केलेली सर्व माहिती व कागदपत्रे खरी आहेत .**

प्रोप्रायटर

पुरवठाधारकाची सही

शिक्का

Civil Surgeon
General Hospital, Amravati